जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक २९.०८.२०२५**

नागरिकांसाठी '' निर्भय ठाणे '' Whats app Chat Bot संदर्भात प्रभावी अंमलबजावणी

ठाणे शहर पोलीस दल अधिकाधिक जनताभिमुख करण्याच्या उद्देशाने व पोलीसांच्या विविध सेवा/उपक्रम जनतेपर्यत प्रभावीपणे पोहचविण्याच्या दृष्टीने ठाणे शहर पोलीसांचे अधिकृत Twitter, Facebook, Instagram, व Whatsapp चॅनेल इत्यादी सोशल मिडीयाद्वारे प्रभावीपणे वापर सुरू आहे.

ठाणे आयुक्तालयाकडून मोबाईल क्रमांक **70394 55555** या क्रमांकाची **''निर्भय ठाणे'' Whats app Chat Bot** सेवा नागरीकांसाठी आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी मा.पोलीस सह आयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या हस्ते लोकार्पित करण्यात आली.

या **Whats app Chat Bot** च्या माध्यमातून नागरिकांना खालीलप्रमाणे विविध सेवा प्राप्त होणार आहेत.

१) **ऑनलाईन तक्रार**

२) **आपत्कालीन संपर्क क्रमांक**

३) **ई – चलन पेमेंट**

४) **सायबर गुन्हा**

५) **हरविलेली / सापडलेली वस्तू**

६) **भाडेकरू नोंदणी**

७) **जवळचे स्थानिक पोलीस ठाणे**

८) **लाईव्ह ट्रॅफिक अपडेट्स**

९) **भारतीय नागरिक संहीता/भारतीय नागरिक सुरक्षा संहिता/भारतीय साक्ष अधिनियम यांची कलमांची माहिती**

१०) **अभिप्राय द्या**

११) **आपले सरकार सेवा**

ठाणे पोलीसांचे ''सदैव सेवेत.. सदैव तत्पर'' व या निर्धारानुसार नागरिकांना सेवा देणे बाबत ठाणे पोलीस आयुक्तालय कटिबद्ध आहे. नागरिकांनी या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे ठाणे पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर